## नियमीत दिवाणी मुकदमा क्रमांक २६१/२०१३ मध्ये नि.क्र. ५५ वरील आदेश

०१. प्रस्तूतचा अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ अन्वये प्रतिवादी क्र. १ यांनी स्वतः अगर त्यांचे गडी, नौकर, चाकर इत्यादीमार्फत दावा मिळकतींमध्ये कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकाम करु नये अथवा फेरबदर करु नये अशी तुर्तातूर्त मनाई ताकीद होणेकरिता दाखल केला आहे.

## थोडक्यात हकिकत खालील प्रमाणेः

०२. मौजे पाचेगांव खुर्द ता. सांगोला जि. सोलापूर येथील जमीनी गट क्र. ११०, ११४, ११५, ११७, १२१, १३१, ३१३, ३९३ आणि ३१७ तसेच घरजागा गट क्र. ३१, ३६ आणि ६२० व मौजे अकोला, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील जमिन गट क्र. ३४४ यास दावा मिळकत असे संबोधले आहे.

०३. वादी यांनी प्रस्तुतचा दावा सरस–निरस मानाने वाटप होऊन पृथ्थक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. यात मूळ पुरुष नामदेव हा सन १९८९ साली मयत झालेला असून, त्यास पत्नी द्रौपदी प्रतिवादी क्र. ५ व प्रतिवादी क्र. १, ३, ४ व मयत प्रकाश अशी चार मुले व प्रतिवादी क्र. ६, ७, ८ या मुली असून, प्रतिवादी क्र. ९ ची आई ही मयत मुलगी होती. वादी क्र. १ चे वडील वादी क्र. २ चे पती प्रकाश हे सन १९९८ मध्ये मयत झालेले असून, त्यास वादी क्र. १ व २ हे वारस आहेत. वादी, प्रतिवादी व मयत नामदेव यांचे एकत्र हिंदू कुटूंब असून, नामदेव व वादीचे क्र. १ चे वडील प्रकाश हे एकत्र कुटूंबातच मयत झालेले आहेत. सन १९८७ मध्ये दावा जमिनीपैकी गट क्र. ११५, १३१, ३१३ आणि ३९३ या जमिनी सिताराम यांचेकडून वादी व प्रतिवादी यांचे वडिलार्जित जमिनीतील उत्पन्नातून व एकत्र कुटूंबाचे उत्पन्नातून प्रतिवादी क्र. १ हा एकत्र कुटूंबांचा कर्ता असल्याने त्याच्या नांवे खरेदी घेतलेल्या आहेत. सदरच्या जमिनी ७/१२

पत्रकी प्रतिवादी क्र. १ चे नांव असले तरी वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत. मौजे नलवडेवाडी येथील जमीन गट क्र. ९ व १० च्या ७/१२ पत्रकी एकत्र कुटूंब मॅनेजर म्हणून प्रतिवादी क्र. १ चे नाव आहे. सन २००३ मध्ये सदर जमिनी प्रतिवादी क्र. १ ने रंजना हरीभाऊ मिसाळ यांना खरेदी दिल्या व जमिनीच्या विक्रीच्या पैशातून एकत्र कुटूंबाचे मिळकतीमधून मौजे अकोला येथील गट क्र. ३४४ पैकी ८८ आर जमीन प्रतिवादी क्र. १ ची पत्नी प्रतिवादी क्र. २ हिचे नांवे वादी व प्रतिवादी यांचे परस्पर खरेदी घेतलेली आहे. दावा कलम क मधील मिळकतींचे अद्याप सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही. प्रतिवादी क्र. १ जमीन गट क्र. ११०, ११४, १२१ व ३१४ चे ७/१२ पत्रकी रेव्हेन्यू अधिका–यांशी संगनमत करुन, वादी क्र. १ चे वडील प्रकाश व इतर प्रतिवादी यांचे परस्पर आणेवारी दाखल करुन, प्रतिवादी क्र. ६, ७, ८ व प्रतिवादी क्र. ९ ची आई सुभद्रा यांचे परस्पर त्यांची नांवे कमी केलेली आहेत. प्रतिवादी क्र. ३ हा सन १९८१ पासून नेपाळ येथे सोने चादी आटणीचा व्यवसाय करीत होता, तो अलीकडे पाचेगांव खुर्द येथे राहत आहे.

०४. वादीचे पुढे असे म्हणणे आहे की, दावा जमिनी वादी व प्रतिवादी क्र. ४ हे वहिवाटीत असून, प्रतिवादी क्र. १ हा वादी व प्रतिवादींचे कुटूंबाचे खर्चाची कसलीही चौकशी करीत नाहीत. त्यामुळे वादी यांना शेतीचे कामे, वादी क्र. १ चे शिक्षणाचा खर्च भागविणे अडचणीचे व जिकीरीचे झालेले आहे. तसेच त्यांना शासनाच्या अनुदानाचा कसलाही लाभ घेता येत नाही व बँकांचे भांडवल उभारुन शेतीचा व्यवसाय करता येत नाही. प्रतिवादी क्र. १ यास दावा मिळकतीची वाटप करुन मागितले असता, वाटप करुन देण्याचे टाळले. प्रतिवादी क्र. १ हा वादी क्र. २ ही विधवा असल्याने त्याचा गैरफायदा घेऊन रस्त्यालगतच्या अति महत्वाच्या जमिनी बळकावू लागला आहे. प्रतिवादी क्र. १ याने दावा जमीन गट क्र. ११० मध्ये दि. ३०/१२/२०१८ रोजी, नवीन बांधकाम चालू केले. दावा जमीन गट क्र. ११० हे पंढरपूर – मिरज हायवेलगत असून ती महत्वाची

जमीन आहे. प्रतिवादी क्र. १ याने वर नमूद रस्त्यालगत पाया खोदून घाई–गडबडीने नवीन बांधकाम सुरु केलेले आहे. वादी हे दि. ०१/०१/२०१९ रोजी सदरच्या बांधकामास हरकत केली असता, प्रतिवादी क्र. १ ने वादी क्र. २ हीस दमदाटी करुन हाकलून दिले. प्रतिवादी क्र. १ याने दावा जमिनीमध्ये नवीन बांधकाम केल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादीस सकृतदर्शनी केस असून, न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे. सबब, वादींचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणेस विनंती केली आहे.

०५. प्रतिवादी क्र. १ याने नि. क्र. ६३ वर प्रस्तूत अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादीने अर्जातील सर्व कथने नाकारलेली आहेत. वादी क्र. २ चे सासरे व प्रतिवादी क्र. १ चे वडील नामदेव व त्याचा भाऊ सिताराम दोघेही मयत झाले आहेत. सिताराम याचे लग्न झालेले नव्हते. तो विनापत्नी राहत होता. नामदेव व सिताराम यांच्यामध्ये वाटप झालेले होते. सदर वाटपामध्ये गट क्र. ११० हा संपूर्ण प्रतिवादी क्र. १ यास गट क्र. ११४ आणि ११७ मधील हिस्सा हा प्रतिवादी क्र. ३ यांना वाटपाने दिलेला आहे. गट क्र. ३१४ मधील १० गुंठे व गट क्र. ३१७ मधील ९ गुंठे तसेच ११७ मध्ये सुध्दा वादीला हिस्सा दिलेला आहे. प्रतिवादी क्र. ४ यांना वाटपाने दिलेले आहे. वाटपाप्रमाणे प्रत्येकाची जमिनीत वहिवाट आहे. त्यामुळे हिंदू कायद्याप्रमाणे वादीस पुन्हा वाटप मागता येत नाही. प्रतिवादी क्र. १ हा १९७७ सालापासून नोकरीस आहे. तो कधीही एकत्र कुटूंबाचा मॅनेजर नव्हता. प्रतिवादी क्र. १ याचे वडील नामदेव हे दि. ३०/०६/१९७८ रोजी सेवानिवृत्त झाले आणि प्रतिवादी क्र. १ हा दि. १४/०६/१९७७ रोजी नोकरीस लागला. त्यामुळे तो वडील नामदेव यांच्या जागी नोकरीस लागल्याचा प्रश्न आलेला नाही. दावा गट क्र. ११५, १३१, ३१३, ३९३, १२४ आणि ३३६ या मिळकती प्रतिवादी क्र. १ याच्या स्वकष्टार्जित व स्वतंत्र मिळकती आहेत. मौजे अकोला येथील गट क्र. ३४४ प्रतिवादी क्र. २ हिची स्वतंत्र मिळकत आहे. ती तिच्या माहेरच्या लोकांकडून पैसे आणून घेतलेली आहे. त्यामुळे ती तिची एकमेव मालकीची जमीन आहे. वादीस दावा मिळकतीचे वाटप झालेले असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ याचे

विरुध्द ताकीद मागता येणार नाही. वादीने सकृतदर्शनी केस मांडलेली नाही. न्यायाचा समतोल हा प्रतिवादी क्र. १ च्या बाजूने आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ यास ताकीद दिली तर त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करणेस विंनती केली आहे.

०६. अर्ज, दावा संचिकेतील कागदपत्रे तसेच, दोंन्ही वकिलांच्या युक्तिवाद या वरुन खाली मुद्दे उपस्थित होतात आणि त्यास मी निम्न कारणांसह उत्तरे देत आहे. आणि वादी व प्रतिवादी वकिलांचा युक्तिवाद लक्षात घेवून मी खालील मुद्दे काढले असून त्या सर्व मुदयांना निष्कर्षासह खालील प्रमाणे उत्तर देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| ०१. | वादीच्या हक्कत प्रथमदर्शनी कसे आहे का ? | -- | होय. |
| ०२. | वादीच्या बाजूने न्यायाचा समतोल आहे का ? | .. | होय. |
| ०३. | मनाई हुकूम नामंजूर केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | .. | होय. |
| ०४. | अंतिम आदेश कोणता ? | .. | अंतिम आदेशा प्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

०७. वादीने आपल्या तोंडी पुराव्याच्या पृष्ठयार्थ खालील कागदपत्रे दाखल करण्यात आले.

| | |
|---|---|
| ०१. | दावा मिळकत गट क्र. ११० मध्ये बांधकामाचे वस्तुस्थिती दाखविणारे छायाचित्रे, |
| ०२. | दि. ०४/०१/२०१९ रोजी, वादीने प्रतिवादी क्र. १ याच्याविरुध्द सांगोला पोलिस स्टेशन येथे दिलेली तक्रार. |

०८. प्रतिवादी क्र. १ ने आपल्या तोंडी पुराव्याच्या पृष्ठयार्थ खालील कागदपत्रे दाखल करण्यात आले.

| | |
|---|---|
| ०१. | प्रतिवादी क्र. १ ने घराचे बांधकाम पूर्ण केल्याबाबत व त्या घरात राहत असल्याबाबतची छायाचित्रे. |

## मान्य असलेल्या बाबीः

०९. वादी क्र. २ चे सासरे व प्रतिवादी क्र. १ चे वडील नामदेव हे सन १९८९ साली मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र. १ हा गट क्र. ११० मध्ये बांधकाम करीत आहे, या बाबी उभयंताना कबुल आहेत.

## मुद्दा क्रमांक १ बाबत:

१०. वादी तर्फे विधीज्ञ श्री. जी. एन. पाटील, यांनी असा युक्तिवाद केला आहे की, दावा मिळकती ह्या हिंदू एकत्र कुटूंबाच्या असून, सदर मिळकतीचे अद्याप वादी आणि प्रतिवादी यांच्यामध्ये वाटप झालेले नाही. अशी परिस्थिती असताना, प्रतिवादी क्र. १ हा गट क्र. ११० या जमिनीमध्ये मिरज–पंढरपूर या महामार्गालगत मोक्याचे ठिकाणी घराचे नवीन बांधकाम करीत आहे. प्रतिवादी क्र. १ यास जोपर्यंत दावा मिळकतीची सरस–निरस मानाने वाटप होत नाही, तोपर्यंत एकत्र कुटूंबाच्या मिळकतीच्या महत्वाच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे स्थायी बांधकाम करता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ याने घराचे बांधकाम करु नये, अशी ताकीत त्यास देणे न्यायाचे दृष्टीने गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. १ याने घराचे बांधकाम पूर्ण केल्यास यातील वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. दावा प्रलंबित असले कारणाने अंतीम निकाला पावेतो कोणतेही बांधकाम करु नये असा आदेश पारित करावा असे सांगितलेले आहे.

११. प्रतिवादी क्र. १ चे विधीज्ञ श्री. एस. एस. पाटणे यांनी असा युक्तिवाद केला की, दावा मिळकतीची यापूर्वीच वाटप झालेले असून, गट क्र. ११० हा प्रतिवादी क्र. १ याच्या हिश्यास वाटून आलेले आहे. तर उर्वरीत मिळकती गट क्र. ३४४ सोडून या प्रतिवादी क्र. १ याने नोकरीच्या पैशातून विकत घेतलेल्या आहेत. त्यामुळे त्या मिळकती ह्या त्याच्या स्वकष्टार्जित व स्वमिळकती

आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ हा त्यास वाटून आलेल्या जमीन मिळकत गट क्र. ११० मध्ये बांधकाम करीत असल्यामुळे सदरच्या बांधकामाबाबत वादीस ताकीत मागता येणार नाही. प्रतिवादी क्र. १ यास ताकीद दिल्यास त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. वादीच्या हक्कात प्रथमदर्शनी केस नाही आणि वादी हे स्वच्छ हाताने न्यायालया समोर आलेले नाहीत. तसेच वादीकडे कोणताही सकृतदर्शनी पुरावा नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

१२. प्रतिवादी नं. १ यांनी ते गट नंबर ११० मध्ये बांधकाम करीत नाही ही बाब त्यांनी स्पष्टपणे नाकारलेली नाही. वादी यांच्या म्हणण्यानुसार दावामिळकती या एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत तर प्रतिवादी नं. १ याचे कथन आहे की दावामिळकतीपैकी गट नंबर ११५, १३१, ३१३, ३९३, १२४ व ३३६ या त्यांनी नोकरीच्या पैशातुन विकत घेतलेल्या आहेत त्यामुळे त्या मिळकती या त्यांच्या स्वकष्टार्जित व स्वतंत्र आहेत. तर गट नंबर ३४४ ही प्रतिवादी नं. २ हिची स्वतंत्र व एकमेव मिळकत आहे कारण ती तीला तीच्या माहेरकडील लोकांनी खरेदी घेवुन दिलेली आहे. शिवाय प्रतिवादी नं. १ यांचे कैफियतीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की त्यांनी त्यांचे मिळकतीमध्ये कथन केले आहे की, सदर वाटपामध्ये गट क्र. ११० हा संपूर्ण प्रतिवादी क्र. १ यास गट क्र. ११४ आणि ११७ मधील हिस्सा हा प्रतिवादी क्र. ३ यांना वाटपाने दिलेला आहे. गट क्र. ३१४ मधील १० गुंठे व गट क्र. ३१७ मधील ९ गुंठे तसेच ११७ मध्ये सुध्दा वादीला हिस्सा दिलेला आहे. प्रतिवादी क्र. ४ यांना वाटपाने दिलेले आहे.

१३. अभिलेखावरती असलेल्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता विशेषतः गट नंबर ११० च्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, नमुद उता–यावरती वाादी व प्रतिवादी यांची नावे समाईक आणेवारीत नमुद आहेत तसेच वादी यांचा नमुद मिळकतीमध्ये तीन आणे दो पैचा हिस्सा म्हणजेच ० हे १९ आर क्षेत्राचा हिस्सा दिसुन येतो. तसेच

इतर मिळकतीमध्ये प्रतिवादींबरोबर समाईक हिस्सा दिसुन येतो. दावामिळकतीच्या इतर ७/१२ उता–यांचे अवलोकन केले असता काही मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या समाईक वहीवाटीच्या दिसुन येत आहेत तर काही मिळकती या प्रतिवादींच्या नावावरती दिसुन येत आहेत. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असाता प्रतिवादीं यांच्या स्वसंपादीत व स्वतंत्र मिळकती असल्याबाबतचा कोणताही सकृतदर्शनी पुरावा दिसुन येत नाही. तसेच प्रतिवादी नं. २ हिस दावामिळकत गट नंबर ३४४ ही तीला माहेरच्या लोकांनी खरेदी दिलेली आहे याबाबतचा कोणताही सकृतदर्शनी पुरावा दिसुन येत नाही. त्यामुळे वादींच्या कथनाप्रमाणे दावामिळकती या एकत्र कुटुंबाच्या मालकीच्या आहेत असे निष्कर्ष काढण्यास सकृतदर्शनी वाव आहे.

१४. वादींच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की एकत्र कुटुंबाच्या मिळकतीध्ये एखादा सहहिस्सेदार इतर सहहिस्सेदारांच्या संमत्तीविना बांधकाम करून शकत नाही जेणेकरून मिळकतीच्या स्वरूपामध्ये बदल होईल आणी त्यामुळे इतर सहहिस्सेदारांच्या हक्कांचे नुकसान होईल. सदर कथनांच्या अनुषंगे वादींच्या विधीज्ञांनी मा. हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाच्या –**अशोक कपुर वि. मुर्तु देवी (CMPMO No. 52 of 2014, decided on 24.06.2015)** या न्यायनिर्णयावरती भिस्त ठेवलेली आहे. तसेच त्यांनी पुढे युक्तीवाद केला की सहहिस्सेदार जो पर्यंत सरसनिरस मानाने वाटप होत नाही पर्यंत तोपर्यंत शेतजमीनीचे स्वरूप इतर सहिस्सेदारांच्या हककांस नुकसान होईल असे बांधकाम करू शकत नाहीत. त्यांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पृष्टर्थ मा. हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाच्या – **मे. शक्ती इंपेक्स अहमदगढ वि. अमर सिंग (CR No. 7796 of 2013, decided on 19.12.2013)** मधील न्यायनिरीक्षणावरती भिस्त ठेवलेली आहे.

१५. वादीने सदर अर्जाच्या पृष्टर्थ दाखल केलेल्या छायाचित्रावरून प्रतिवादी नं. १ ने घराच्या पायाच्या बांधकाम केलेचे दिसुन येत आहे. तसेच प्रतिवादी नं. १ यांनी फोटो दाखल करून

घराचे बांधकाम पुर्ण झाले असुन त्यामध्ये प्रतिवादी नं. १ हा राहत असलयाबाबतचे छायाचित्रे दाखल केलेली आहेत. प्रतिवादी नं. १ यांनी दाखल केलेल्या छायाचित्रावरून त्यांनी वादातील जागेमध्ये दगड, सिमेंटने बांधकाम केलेल्या पायावरती पत्रा आणी अँगलने बांधकामाच्या पायावरती घाईगडबडीने केलेचे दिसुन येत आहे. वादातील दगड सिमेंटच्या पायवारती प्रतिवादी नं. १ यांनी सिमेंट व विटा यांचे बांधकाम केलेचे दिसुन येत नाही. प्रस्तुतच्या केसमध्ये दावामिळकती या एकत्र कुटुंबाच्या आहेत असे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. प्रतिवादी नं. १ हा गट नंबर ११० मध्ये बांधकाम करीत आहे हे बाब वादात नाही. त्यामुळे. **अशोक कपुर वि. मुर्तु देवी (CMPMO No. 52 of 2014, decided on 24.06.2015)** मधील न्यायनिरीक्षणे इंग्रजी भाषेमध्ये असल्यामुळे निरीक्षणे इंग्रजी भाषेतच नमुद केली, "Once it is so, then the petitioner cannot claim a right ot raise construction without the consent of the other co–sharer nor does he have any right to put up any portion of the joint holding to such a use which is detrimental to the interest of the other co–sharer or may amount to change of user of the property or ouster of the other co–sharer from that portion" आणी **मे. शक्ती इंपेक्स अहमदगढ वि. अमर सिंग (CR No. 7796 of 2013, decided on 19.12.2013)** मधील न्यायनिरीक्षणे इंग्रजी भाषेमध्ये असल्यामुळे निरीक्षणे इंग्रजी भाषेतच नमुद केली,''As a result of above discussion, it is held that a co–sharer whether in exclusive or not in exclusive possession cannot change the nature of agricultural land by raising construction detrimental to the interest of other co–shares without seeking partition by metes and bounds ''.

१६. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ हा त्याचे बांधकाम दावामिळकतीमध्ये करीत असलेचे

कथन केलेले आहे. त्यामुळे वर नमुद न्यायनिर्णयामधील निरीक्षणांचा विचार करता वादी कथन करतो त्याप्रमाणे वादीस असलेली भिती ही अन्य पुरक पुराव्या अभावी सकृतदर्शनी योग्य कारणावर आधारलेली आहे असे दिसुन येते. सबब,सकृतदर्शनी प्रतिवादी क्र. १ हा हिंदु एकत्र कुटुंबाच्या दावामिळकतीमध्ये कायमस्वरुपी बांधकाम करित आहे हे कथन वादी सिध्द करु शकला असे स्पष्टपणे दिसुन येते. अर्थातच या अर्जा कामी मांडलेले निष्कर्ष फक्त याच अर्जाखाली मर्यादित असून ते चौकशीच्या वेळी समोर येणा–या पुराव्यास अधिन राहतील. सबब, वर नमुद कारणास्तव मी मुद्दा क्र. १ बाबत होकारार्थी निष्कर्ष नोंदवत आहे.

## <u>मुद्दे क्रमांक २ व ३ बाबत :</u>

१७. सोईचे व न्यायाचे समतोलत्व व नुकसानीचे तत्व या गोष्टींचा विचार करतांना प्रतिवादी क्र. १ हा कायमस्वरुपी बांधकाम करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत असल्यामुळे वर नमुद न्यायनिर्णयांमधील **<u>अशोक कपुर वि. मुर्तु देवी (CMPMO No. 52 of 2014, decided on 24.06.2015)मे. शक्ती इंपेक्स अहमदगढ वि. अमर सिंग (CR No. 7796 of 2013, decided on 19.12.2013)</u>** निरीक्षणे म्हणजेच एकत्र कुटुंबाच्या मिळकतीध्ये एखादा सहहिस्सेदार इतर सहहिस्सेदारांच्या संमत्तीविना बांधकाम करून शकत नाही जेणेकरून मिळकतीच्या स्वरूपामध्ये बदल होईल आणी त्यामुळे इतर सहहिस्सेदारांच्या हक्कांचे नुकसान होईल. तसेच सहहिस्सेदार जो पर्यंत सरसनिरस मानाने वाटप होत नाही पर्यंत तोपर्यंत शेतजमीनीचे स्वरूप इतर सहिस्सेदारांच्या हककांस नुकसान होईल असे बांधकाम करू शकत नाहीत. त्यामुळे दावा मिळकतीचे स्वरूप बदलुन वादी यांच्या हक्कांचे नुकसान होणार आहे. परिणामी प्रतिवादीच नं. १ चे नुकसान होणार नाही. प्रतिवादी नं. १ बाबत वादीस असलेली भिती ही साधार आहे. या बाबतही सकृतदर्शनी पुरावा आहे. त्यामुळे प्रस्तूत अर्ज जर नामंजूर केला तर प्रतिवादी नं. १ चे काहीच नुकसान होण्याचे कारण नाही. सबब,सोईचे समतोलत्व वादीच्या बाजूने

आहे. प्रस्तूत अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान होणार आहे. सबब, मुद्दा क्र. २ व ३ बाबत त्यानुसार नकारार्थी निष्कर्ष नोंदवत आहे.

## मुद्दा क्रमांक ४ बाबत :

१८. वर नमुद कारणांचा विचार करता वादीस सकृतदर्शनी कथन आहे असे स्पष्ट होते व न्यायाचे व सोईचे समतोलत्व तसेच नुकसानीचे तत्व वादींच्याच बाजूने असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे प्रस्तूत अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. कारणे मुद्दा क्र. ४ च्या निष्कर्षा दाखल खालील आदेश देत आहे.

## आदेश

०१. अर्ज नि.क्र. ५५ मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र. १ यांना या तात्पुरत्या ताकीदीद्वारे आदेशित करण्यात येते की, त्यांनी व त्यांच्यामार्फत इतर कोणीही दावा मिळकतीमध्ये या वादपत्राच्या अंतिम निकालापर्यंत नवीन बांधकाम करुन दावा मिळकतीमध्ये बदल करु नये.

**(रा.बा. खंदारे)**

दिनांक ०७.०१.२०१९ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सांगोला

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. K. Torane |
| (b) | Court | : | Shri. R.B. Khandare,<br>II Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 07.01.2019 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 10.01.2019 |